| MHPU240017052024 | **रे. मु. नं. १८५/२०२४**<br><br>**सचिन लोंढे व इतर**<br>विरुद्ध<br>**रामचंद्र लोंढे व इतर** |
|---|---|

## निशाणी क्र.५ खालील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ व २ यांनी स्वत: अगर त्यांचे मार्फत त्यांचे कुटुंबीय, एजंट अथवा मुखत्यारपत्रधारक यांचे मार्फत कोणत्याही स्वरुपाचे खरेदी, विक्री, गहाण, दान, लीन, लीज इत्यादी स्वरुपाचे त्रयस्थ हक्क निर्माण करु नये व प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी दावामिळकतीतील वादींच्या शांततामय ताबेवहिवाटीस हिल्ला हरकत करू नये, अशी तूर्तातूर्त ताकीद होउन मिळणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे दाखल केलेला आहे.

**वादीची बाजु थोडक्यात खालीलप्रमाणे :—**

**०२. मिळकतीचे वर्णन —**

जिल्हा पुणे, ता. आंबेगाव पैकी, मौजे वळती येथील शेतजमीन मिळकती :—

गट नं.१५८१ क्षेत्र ०१ हे. ८८ आर व सदर मिळकतीमधील मधील विहिर व त्यावरील मोटार व सातशे फुट लांबीच्या पि.व्ही.सी. पाईपलाईन यासह मिळकत हा दाव्याचा विषय असुन त्यास ''दावा मिळकत'' म्हणून संबोधण्यात आले आहे.

**०३.** वादीच्या कथनानुसार, वादी क्र.१ व २ हे प्रतिवादी क्र.१ व ४ यांची मुले आहेत. प्रतिवादी क्र.३ ही प्रतिवादी क्र.१ ची प्रथम पत्नी असून प्रतिवादी क्र. ४ ही वादीची द्वितीय पत्नी आहे. प्रतिवादी क्र.२ हा प्रतिवादी क्र.१ व ३ चा मुलगा आहे. दावामिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या एकत्र हिंदु कुटुंबाच्या वडिलोपार्जीत मालकी व ताबेवहिवाटीची आहे. सदर मिळकत प्रतिवादी क्र.१ चे वडील आबु लोंढे यांच्या नावे दाखल होती. सदर मिळकतीबाबत आबु

लोंढे यांनी सन १९७८ साली त्यांच्या मुलांमध्ये वाटप करून दिले. सदर वाटपानुसार दावामिळकत ही प्रतिवादी क्र.१ च्या नावे नोंद झाली. तेव्हापासुन आजतागायत दावामिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ याच्या वडिलोपार्जित मालकी वहिवाटीची मिळकत आहे. सदर मिळकतीचे अद्याप सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. प्रतिवादी क्र.१ हे त्यांच्या वडील व भावांसोबत एकत्र कुटूंबात रहात असताना सन १९७६ साली त्यांचा विवाह प्रतिवादी क्र.३ चे सोबत झाला होता. प्रतिवादी क्र.३ ही १ ते २ महिने नांदली. त्यानंतर ती तिच्या माहेरी निघून गेली. प्रतिवादी क्र.३ ही २ ते ३ वर्षे नांदणेस आली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ने वादीची आई प्रतिवादी क्र.४ हिचे सोबत दुसरा विवाह केला. विवाहानंतर वादी क्र.२ हिचा जन्म झाल्याची माहिती प्रतिवादी क्र.३ हिला समजल्यानंतर ती पुन्हा जबरदस्तीने नांदणेस आली. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ याच्याकडे दोन्ही पत्नी नांदत होत्या. त्यानंतर प्रतिवादी क्र.३ हिला मुलगा झाला व प्रतिवादी क्र.४ हिला वादी क्र.१ हा मुलगा झाला. त्यानंतर प्रतिवादी क्र.३ हिला प्रतिवादी क्र.२ हा मुलगा झाला. प्रतिवादी क्र.१ व ३ चा मुलगा दिनेश हा अपघातात मयत झालेला आहे. वादी क्र.२ हिचा विवाह प्रतिवादी क्र.१ यांनी करुन दिला आहे. सन २०१२ मध्ये प्रतिवादी क्र.४ चे वडील मयत झालेनंतर प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.४ हिला भावाकडून हिस्सा मागून घेण्यास सांगितले. परंतु, प्रतिवादी क्र.४ हिने भावांना आग्रह केला नाही म्हणून प्रतिवादी क्र.१ याने वादी व प्रतिवादी क्र. ४ यांना घराबाहेर काढले. त्यानंतर वादी व प्रतिवादी क्र.४ हे खोदड येथे प्रतिवादी क्र.४ चे माहेरी राहू लागले.

**०४.** वादी यांच्या कथनानुसार, वादी व प्रतिवादी क्र.४ हे मोलमजुरी करुन आपला उदरनिर्वाह करीत होते. प्रतिवादी क्र.१ चे भाउ मच्छिंद्र लोंढे यांनी शिंगवे येथील त्याच्या खरेदी मालकीची जमिन सन २००८ साली विक्रीस काढली होती. त्यावेळी वादी क्र.१ यास मोलमजुरी शिवाय उत्पन्नाचे साधन नसल्याने मामा, नातेवाईक, चुलते यांनी आर्थिक मदत करुन सदरची जमिन खरेदी करुन दिली. तेव्हापासून वादी हे सदर जमिनीवर आपला उदरनिर्वाह करीत आहेत. वादी क्र.१ हा त्याच्या चुलत्याकडे कामानिमित्त गेला असता त्याला प्रतिवादी क्र.१ यांनी

मुलगा प्रतिवादी क्र.२ यास दावा जमिन गट क्र.१५८१ पैकी १ हे. २० आर ही मिळकत दि.२३/०६/२०१० रोजी र.द.क्र.२५२४/२०१० अन्वये विक्री केल्याचे समजले. त्यानंतर वादीने त्याबाबत माहिती घेतली असता प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दावा मिळकतीतील २० गुंठे इतके क्षेत्र दि.०९/०७/२०२४ रोजी अनाधिकाराने प्रतिवादी क्र.५ व ६ यांना विक्री केल्याचे समजले. त्यावेळी वादी यांनी फेरफार क्र.२८७५ च्या नोंदीस हरकत घेतलेली आहे. प्रतिवादी यांनी वादीचा हिस्सा डावलण्याच्या हेतूने प्रतिवादी क्र.२ व प्रतिवादी क्र.५ व ६ यांना बेकायदेशीर खरेदीखत करुन दिलेले आहे. सदरची खरेदीखते वादीचे हिश्श्यावर बंधनकारक नाहीत. प्रतिवादी क्र.५ व ६ यांना सदर ४० गुंठे क्षेत्राचा ताबा मिळालेला नाही. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी क्र.१ व २ यांचेकडे वाटप मागितले असता त्यांनी वादींना हिस्सा देण्यास नकार दिला. त्यामुळे वादी यांना प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडले आहे.

**०५.** वादी यांच्या कथनानुसार दाव्याचा निर्णय होण्यास बराच कालावधी लागणार आहे. दरम्यानच्या काळात प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दावा मिळकतीमध्ये ति—हाईत इसमांचे हक्क निर्माण केल्यास व प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी वादीचे शांततामय वहिवाटीस हिल्ला हरकत केल्यास वादी यांचे कधीही भरुन न येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे. वादीला प्रथमदर्शनी केस असून न्यायाचा तराजू वादीचे बाजूने आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

**०६.** प्रतिवादी क्र.१ ते ३ व ५ यांनी नि.क्र.२६ व प्रतिवादी क्र.६ यांनी नि.क्र.२९ अन्वये आपली कैफियत व जबाब दाखल करुन दाव्यास व अर्जास विरोध दर्शविला. त्यांच्या कथनानुसार, वादीस दावा दाखल करणेस कोणतेही कारण घडलेले नाही. वादीने चुकीच्या चतु:सिमा नमूद केलेल्या आहेत. मौजे शिंगवे येथील वादीच्या नावावर असलेली एकत्र कुटुंबातील मिळकत दाव्यात समाविष्ट केलेली नाही. त्यामुळे वादीचा दावा फेटाळणेस पात्र आहे. वादीने सन २०१० सालातील खरेदीखताबाबत ठराव करुन मागितला आहे. त्यामुळे वादीचा दावा मुदतीत नाही. वादी द्वितीय पत्नीचा मुलगा असल्याने हिंदू वारसा कायदयातील कलम ६ व ८ मधील तरतुदींप्रमाणे वादीस वाटपाचा दावा दाखल

करता येत नाही. सदर वादीचा दावा फेटाळण्यास पात्र आहे.

**०७.** प्रतिवादी यांच्या कथनानुसार, मौजे शिंगवे येथील गट क्र.३९७ व ३९८ या मिळकती नवनाथ लोंढे, रामचंद्र आबू लोंढे व मच्छिंद्र आबू लोंढे यांनी एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून मच्छिंद्र लोंढे यांचे नावावर खरेदी केल्या होत्या. रामचंद्र आबू लोंढे यांना सदर मिळकती तोंडी वाटपाने दिल्या होत्या. रामचंद्र लोंढे यांना तोंडी वाटपाने आलेली सदर मिळकत मच्छिंद्र लोंढे यांनी वादी क्र.१ यांचे नावावर खरेदी दिली व सदर खरेदीखताचा संपूर्ण खर्च रामचंद्र लोंढे यांनी केला होता. वादी क्र.१ चे नावावर केलेली मिळकत गट क्र.३९७ व ३९८ या वादीच्या स्वतंत्र खरेदीच्या नसून एकत्रातील कुटुंबाच्या वतीने वादीचे नावावर आहेत. गट क्र.१५८१ पैकी १ हे. २० आर मिळकत प्रतिवादी क्र.२ याचे नावावर दि.२३/०६/२०१० रोजी र.द.नं.२५२४/२०१० अन्वये केली होती. त्याप्रमाणे फेरफार होवून ७/१२ सदरी प्रतिवादी क्र.२ च्या नावाची नोंद झाली होती. सद्यस्थितीत सदर मिळकतीस प्रतिवादी क्र.५ व ६ यांच्या नावाची नोंद आहे. गट नं.१५८१ पैकी २० गुंठे क्षेत्रास प्रतिवादी क्र.५ व २० गुंठे क्षेत्रास प्रतिवादी क्र. ६ यांच्या नावाची नोंद खरेदी मालकीने झाली आहे. तसेच प्रतिवादी क्र.५ व ६ हे सदर मिळकतीत ताबेवहिवाट करीत आहेत. सबब, वादीचा दावा व मनाई अर्ज फेटाळण्यास पात्र आहे.

**०८.** प्रतिवादी यांच्या कथनानुसार, प्रतिवादी क्र.१ यांचा दिड वर्षापुर्वी अपघात झाला होता व अपघातात समोरची व्यक्ती हरीभाउ भोर यांनी प्रतिवादी क्र.१ यांचे उपचारासाठी रक्कम रु.१२,०००/— इतकी रक्कम वादी क्र.१ कडे दिली होती. परंतु वादी क्र.१ यांनी अद्यापपर्यंत सदरची रक्कम प्रतिवादी क्र.१ यांस दिलेली नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी वादी क्र.१ यांचेसाठी वळती वि.वि.का.सेवा सोसायटी वळती यांचेकडून गाय घेण्यासाठी कर्ज काढले होते. सदर कर्जाचे हप्ते वादी क्र.१ हे भरणार होते. परंतु, त्यांनी सदर कर्जाची परतफेड केलेली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांनी जमिन विक्री करुन सदरची रक्कम भरलेली आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांना तोंडी वाटपाने आलेली मिळकत गट क्र.३९७ व ३९८ ही मिळकत वादी सचिन लोंढे याच्या नावावर करण्यास सांगितले होते. त्यावेळेस

वादीस उत्पन्नाचे साधन नव्हते. वादीने वाटप मागत असताना सदर मिळकत समाविष्ट करणे आवश्यक होते. परंतु, जाणिवपूर्वक सदरची मिळकत दाव्यात समाविष्ट केलेली नाही. त्यामुळे वादीचा दावा व मनाई अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. प्रतिवादी यांना प्रथमदर्शनी केस असून न्यायाचा समतोल प्रतिवादीचे बाजूने आहे. वादीचा मनाई अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादींचे अतोनात नुकसान होईल. याउलट, वादीचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, वादीचा दावा व मनाई अर्ज फेटाळण्यात यावा, अशी विनंती केली.

**०९.** वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस.डी. आर्विकर व प्रतिवादी क्र.१ ते ३, ५ व ६ तर्फे विधिज्ञ श्री. पी.ए. काळे यांचा युक्तीवाद ऐकला. वादींच्या दाव्यातील, अर्जातील व प्रतिवादीच्या कैफियत व म्हणण्यातील कथनांचा विचार करता खालीलप्रमाणे वादप्रश्न माझे निर्दशनास आले. त्यास निष्कर्षासहीत आणि कारणांसहीत विचाराधीन घेतले आहेत, ते खालील प्रमाणे :

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीने सकृतदर्शनी केस शाबीत केली आहे काय ? | **नाही** |
| २. | न्यायाचे समतलत्व वादीचे बाजूने आहे काय ? | **नाही** |
| ३. | अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे कधीही न भरून येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | **नाही** |
| ४. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणेमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीता :**

**१०.** वादींनी सदरचे अर्जातील कथनापुष्ट्यर्थ नि.क्र.३ सोबत मौजे वळती येथील खाते क्र.९५२ व १२३८ चे ८अ उतारे, दावा मिळकतीचा ७/१२ उतारा, फेरफार क्र.६१, २३८१, ५८७५ चे उतारे, फेरफार क्र.५८८४ ची नोटीस, खरेदीखत दस्त क्र.२५२४/२०१० व क्र.३५३७/२०२४ या खरेदीदस्तांची

छायांकीत प्रत, अशी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. याउलट, प्रतिवादी क्र.१ ते ३, ५ व ६ यांनी मौजे वळती येथील खाते क्र.१९३१२० व १९३१२१ चे ८अ उतारे व गट क्र.१५८१ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे.

**११.** सदर कामी वादीतर्फे करण्यात आलेल्या युक्तीवादानुसार, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची वडिलोपार्जित जमिन आहे. दावा मिळकतीच्या सातबारा पत्रकी प्रतिवादी क्र.१ यांच्या नावांची नोंद होती. दावा मिळकतींचे अद्याप सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. असे असतांना प्रतिवादी क्र.१ यांनी वादीचा हिस्सा डावलण्याच्या हेतूने दावा मिळकतीतील ०१ हे. २० आर इतके क्षेत्र प्रतिवादी क्र.२ यांना दि.२३/०६/२०१० रोजीच्या पोकळीस्त खरेदीखताने दिलेले आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दावा मिळकतीतील ४० गुंठे इतके क्षेत्र प्रतिवादी क्र.५ व ६ यांना विक्री केलेले आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादीचा हिस्सा डावलण्याच्या हेतूने कोणताही अधिकार नसताना दावा मिळकतीतील क्षेत्र विक्री केलेले आहे. वादी यांनी सदर खरेदीखताअन्वये झालेल्या फेरफारास हरकत घेतलेली होती. दावा मिळकत ही एकत्र कुटुंबाची असल्याने प्रतिवादी क्र.५ व ६ यांना खरेदी क्षेत्राचा ताबा मिळालेला नाही. परंतु प्रतिवादी क्र. ५ व ६ हे सदर खरेदीखताच्या आधारे वादीच्या दावा मिळकतीतील शांततामय ताबा वहिवाटीस हिल्ला हरकत करणेच्या प्रयत्नात आहेत. तसे झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. वादींतर्फे विधीज्ञ यांनी युक्तीवादादरम्यान मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील, डॉ. निलकंठ कृष्णराव आपटे वि. डॉ. रामचंद्र कृष्णराव आपटे व इतर ए.आय.आर. १९९१ बॉम्बे १० १९९१, मा. सर्वौच्च न्यायालय यांचेकडील, रामदास वि. सिताबाई व इतर २००९ ए.आय.आर. एस. सी.डब्ल्यु. ४३६५, मा. उच्च न्यायालय हिमाचल प्रदेश यांचेकडील, जोगिंदर सिंह वि. सुरेश कुमार ए.आय.आर. हिमाचल प्रदेश १८ (२०१५) या न्यायनिर्णयांबाबत सांगितले.

**१२.** वादीतर्फे विधिज्ञ यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. १ व २ हे दावा मिळकत त्रयस्थ इसमांना तबदील करणेच्या प्रयत्नात आहेत. त्यांनी दावा मिळकत तबदील केल्यास वादीच्या कायदेशीर हक्कांवर गदा येणार

आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दावा मिळमतींमध्ये कोणत्याही स्वरुपाचे हक्क निर्माण करु नये अशी तूर्तातूर्त मनाई प्रतिवादी क्र.१ व २ यांचेविरुद्ध करणे आवश्यक आहे. तसेच प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी वादीच्या दावा मिळकतीतील शांततामय ताबेवहिवाटीस हिल्ला हरकत करु नये अशी तुर्तातुर्त मनाई प्रतिवादी क्र. ५ व ६ यांचे विरुध्द करणे आवश्यक आहे. वादीच्या बाजूने प्रथमदर्शनी केस असुन न्यायाचा तराजूदेखील वादीच्या बाजूने आहे. वादीचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट, वादी यांचा अर्ज नामंजूर केल्यास वादी यांचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. सबब, वादी यांचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

**१३.** प्रतिवादी क्र.१ ते ३, ५ व ६ यांचेतर्फे करण्यात आलेल्या युक्तीवादानुसार वादी हे प्रतिवादी क्र.१ च्या दुस—या पत्नीची मुले असल्याने त्यांना हिंदू वारसा कायद्यातील तरतुदीं प्रमाणे वाटपाचा दावा दाखल करता येणार नाही. तसेच प्रतिवादी क्र.१ यास दावा मिळकत वाटपाने आलेली आहे. प्रतिवादी क्र.१ व त्याचे भाउ यांच्यामध्ये झालेल्या वाटपाच्या दरम्यान प्रतिवादी क्र.१ याचे हिश्श्यास पारगांव शिंगवे येथील गट क्र.३९७ व ३९८ या मिळकती आल्या होत्या. सदर मिळकती प्रतिवादी क्र.१ चे भाउ मच्छिंद्र लोंढे यांच्या नावे एकत्र कुटुंबाचे उत्पन्नातून खरेदी केलेल्या होत्या. सदर मिळकती प्रतिवादी क्र.१ च्या हिश्श्यास वाटपाने आल्याने मच्छिंद्र लोंढे यांनी सदर मिळकत वादी क्र.१ च्या नावावर खरेदीखताने दिली. सदर खरेदीखताचा खर्च रामचंद्र लोंढे यांनी केला होता. सदरच्या मिळकती वादी क्र.१ च्या स्वतंत्र खरेदीच्या मिळकती नसून एकत्र कुटुंबाच्या वतीने वादी क्र.१ च्या नावावर केलेल्या मिळकती आहेत. वादीने सदर मिळकती दाव्यात सामिल केलेल्या नाहीत. त्यामुळे वादीचा वाटपाचा दावा कायदयाने चालण्यास पात्र नाही. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी कर्जाची रक्कम भरण्याकरिता दावा मिळकतीतील ४० गुंठे क्षेत्र प्रतिवादी क्र.५ व ६ यांना खरेदी दिलेले आहे. सदर खरेदीखतानुसार प्रतिवादी क्र.५ व ६ हे खरेदी क्षेत्राच्या ताबेवहिवाटीत आहेत. अशा परिस्थितीत वादीस प्रथमदर्शनी केस नसून न्यायाचा तराजू प्रतिवादी क्र.१ ते ३, ५ व ६ यांचे बाजूने आहे. वादीचा अर्ज

मंजूर झाल्यास प्रतिवादी क्र.१ ते ३, ५ व ६ यांचे कधीही भरुन न येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे. याउलट, वादीचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, वादीचा दावा व मनाई अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. सबब, अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

**१४.** सकृतदर्शनी केस म्हणजे दिवाणी पक्षकाराने त्याचे कायदेशीर कथनांबाबत सबळ पुरावा सादर करणे होय. या ठिकाणी सकृतदर्शनी केस शाबीत करतांना वादीने त्याच्या दाव्यातील कथनातील सर्व बाबी संदर्भात सबळ पुरावा देणे गरजेचे आहे. परंतु, जर वादीस त्याचे मागणीस दुजोरा देणारा सबळ पुरावा मांडता आला नाही, तर प्रतिवादीच्या हक्कात निर्णय देणे अनिर्वाय ठरते. कारण दिवाणी केसमध्ये न्यायालयास स्वतःची बाजू पटवून देण्याची प्रथम व महत्वपूर्ण जबाबदारी ही नेहमी वादीचीच असते.

**१५.** वादी यांनी त्यांच्या कथनाच्या पुष्टयर्थ नि.क्र.३ सोबत दावा मिळकतीचा सातबारा उतारा दाखल केलेला आहे. सदर सातबारा उता—याचे अवलोकन केले असता दावा मिळकतीपैकी ६८ गुंठे क्षेत्रास प्रतिवादी क्र.१ व ०१ हे.२०गुंठे क्षेत्रास प्रतिवादी क्र.२ यांचे नावांची नोंद असल्याचे दिसुन येते. याउलट, प्रतिवादी क्र.१ ते ३, ५ व ६ यांनी दाखल केलेल्या दावा मिळकतीच्या ७/१२ उता—याचे अवलोकन केले असता दावा मिळकतीपैकी ४८ गुंठे क्षेत्रास प्रतिवादी क्र.१, ०१ हेक्टर क्षेत्रास प्रतिवादी क्र.२, २० गुंठे क्षेत्रास प्रतिवादी क्र.५ व २० गुंठे क्षेत्रास प्रतिवादी क्र.६ यांच्या नावाची नोंद असल्याचे दिसून येते. वादी यांच्या कथनानुसार, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची वडिलोपार्जित मिळकत आहे. वादी यांनी त्यांच्या कथनाच्या पुष्टयर्थ फेरफार क्र.६१ चा उतारा दाखल केलेला आहे. सदर उता—याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.१ चे वडील आबू लोंढे यांनी सन १९७८ मध्ये मिळकतींच्या उता—यास मुलांची नावे दाखल करुन स्वतःचे नांव कमी करण्याबाबत अर्ज दिलेला होता. सदर अर्जानुसार प्रतिवादी क्र.१ चे नाव दावा मिळकत गट क्र.१५८१ च्या उता—यास नोंद करण्याबाबत फेरफार मंजूर झालेला दिसतो. यावरुन दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.१ यांची वडिलोपार्जित मिळकत असल्याचे दिसून येते.

**१६.** प्रतिवादी क्र.१ ते ३, ५ व ६ यांच्या कथनानुसार वादी हे प्रतिवादी क्र.१ च्या दुस—या पत्नीची मुले असल्याने त्यांना वाटपाचा दावा दाखल करता येणार नाही. वादी हे प्रतिवादी क्र.१ च्या दुस—या पत्नीचे मुले असल्याची बाब वादातीत नाही. कायदेशीर बाब पाहता, हिंदु वारसा कायद्यातील तरतुदी व प्रचलित कायद्यानुसार दुस—या पत्नीच्या मुलांना वडिलांच्या संपत्तीमध्ये औरस मुलांप्रमाणे हक्क दिलेले आहेत. परंतु, दुस—या पत्नीच्या मुलांना वडिलांच्या हयातीत वाटप मागण्याचा अधिकार नाही. तसेच वादी यांनी त्यांची दावामिळकतीत वहिवाट असल्याबाबत कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आणला असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. अशा परिस्थितीत वादी मागणी करतात त्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई आदेश पारीत करणे न्यायोचीत होणार नाही. वादीच्या दाव्यातील कथन व कागदोपत्री पुरावा पाहता वादीस प्रथमदर्शनी केस आहे हे वादींनी शाबीत केलेले नाही. सबब मी वादप्रश्न क्र.१ चे उत्तर नकारार्थी दर्शवीत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ व ३ करीता</u> :—**

**१७.** मुद्दा क्र.१ च्या निष्कर्षावरुन सदरकामी न्यायाचे समतलत्व देखील वादीचे बाजूने असल्याचे आढळून येत नाही. वादीने दाखल केलेली कागदपत्रे व प्रतिवादींनी दाखल केलेले म्हणणे व कागदपत्रे या बाबी पाहता तुलनात्मकरित्या विचार केल्यास न्यायाचे संतुलन वादीच्या बाजुने असल्याचे दिसुन येत नाही. वादीने दाखल केलेल्या न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती वेगवेगळी असल्याने वादी यांना सदर न्यायनिर्णयांची मदत होवू शकणार नाही. तसेच, वर नमुद विश्लेषणावरुन वादीचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होईल असे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. सबब, मी मुद्दा क्र.२ व ३ चे उत्तर नकारार्थी दर्शवलेले आहे.

## <u>आदेश</u>

वादीचा निशाणी क्र.५ चा तुर्तातुर्त ताकीद अर्ज नामंजूर करण्यात येतो.

MEGHA SHASHIKANT MALI
Digitally signed by MEGHA SHASHIKANT MALI
Date: 2025.02.01 15:45:57 +0530

**(श्रीमती एम. एस. माळी)**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
घोडेगांव, जि. पुणे.

ठिकाण : घोडेगांव
दिनांक : २९/०१/२०२५

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी शपथेवर सांगतो की, आदेशातील मूळ मजकूर व पी.डी.एफ. मधील मजकूर शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | |
|---|---|
| न्यायालयाचे नांव | : श्रीमती एम. एस. माळी सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर, घ ोडेगांव,ता. आंबेगाव जि. पुणे. |
| लघुलेखकाचे नाव | : आर. के. शेंगुळे, लघुलेखक श्रेणी—३. |
| निकाल तारीख | : २९/०१/२०२५ |
| पिठासीन अधिका—याने आदेशपत्रावर सही केलेचा दिनांक | : २९/०१/२०२५ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | : ०१/०२/२०२५ |